# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/07/2023 (गुरूवार) दुपार


---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. खापरखेडा :-** अंतर्गत ०५ किमी अंतरावर जलदर्शन बार किल्लेकोलार दहेगाव रंगारी येथे दिनांक १९/०७/२०२३ ते दिनांक २०/०७/२०२३ चे २२.३० वा. ते ००.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे- अशोक रामप्रसाद पासवान, वय ५७ वर्ष, रा. वार्ड नं. ०४ दहेगाव रंगारी याचा मित्र नामे- अमरजित सिंगने फिर्यादीला फोन करून सांगितले की फिर्यादीचा मोठा मुलगा मृतक नामे- निखिल पासवान याचे नांदा येथे झगडा भांडण झाले आहे. फिर्यादी व फिर्यादीची पत्नी हे दोघेही नांदा येथे गेले असता त्या ठिकाणी निखिलचा मित्र अमरजितसिंग, आशिष शास्त्री हे जलदर्शन बार जवळ उभे होते आणि त्या ठिकाणी पोलीस उपस्थित होते. रस्त्याच्या कडेला निखीलचा मृतदेह पडलेला होता, निखिलच्या मानेवर, पाठीवर आणि हातावर आरोपी नामे- राहुल राजन सुर्यवंशी, रा. वार्ड नं. ०३ सिल्लेवाडा खापरखेडा याने जलदर्शन बार दहेगावजवळ चाकूने वार करून जिवानीशी ठार केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक दिपक कॉक्रेटवार मो. नं. ८३२९६६६६७८ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. जलालखेडा :-** अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मौजा भिष्णूर शिवार येथे दिनांक १५/०७/२०२३ चे रात्री ०८.०० वा. ते दिनांक १६/०७/२०२३ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे- गणेश मोरेश्वर खोडे, वय २५ वर्ष रा. वार्ड नं ३ भिष्णुर हे सायंकाळी ०७.०० वा. शेतातुन घरी जात असता कोठयाच्या आत बघीतले असता पावर ग्रिड मशिन तसेच बाकीचे साहीत्य कोठयातच होते. दिनांक १६/०७/२०२३ चे १०.०० वा. दरम्यान शेतात गेले असता कोठयाचे लॉक खुले असुन कडी लावलेली दिसली त्यानंतर कोठयाच्या आत मध्ये जावुन बघीतले असता कोठयात ठेवलेली एक हिरव्या रंगाची (डी.७५५) पेट्रोल पावर मशिन ४०,०००/-रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक दिनेश जोगेकर मो. नं. ८८३०६०४५०६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर